क्रमांकः संकीर्ण-२०१५/ प्र.क्र.५२ /रस्ते-९
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : ०९.०६.२०१५.

विषय : सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाअंतर्गत असलेल्या रस्त्यांचा खडबडीतपणा मोजण्यासाठीची अरुर चाचणी मेरी संस्थेमार्फत करुन घेणे "अनिवार्य" करणेबाबत...

संदर्भ : महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, दिंडोरी रोड, नशिक यांचे दिनांक १२.०३.२०१५ रोजीचे पत्र.

ज्ञापन :-

उपरोक्त संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने मला असे कळविण्याचे आदेश आहेत की, दि मेरी (The Maharashtra Engineering Research Institute) ही जलसंपदा विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाची अग्रगण्य संस्था असून त्या संस्थेअंतर्गत असलेल्या महामार्ग संशोधन विभाग क्र.१ यांच्याकडे रस्त्यांचा खडबडीतपणा मोजण्यासाठी लागणारी व सी.आर.आर.आय., नवी दिल्ली यांनी प्रमाणित केलेली अरुर (Automatic Road Unevenness Recorder) ही कार ॲक्सल माउंटेड मशीन उपलब्ध आहे. अरुर चाचणी मेरी संस्थेमार्फत करुन घेतल्यास ती जास्त विश्वासार्ह व शासकिय महसुलवाढीच्या दृष्टीनेही फायद्याची ठरणार आहे. त्यामूळे या विभागाच्या अखत्यारीतील सर्व 'बांधा, वापरा हस्तांतरीत करा' तत्वावर बांधण्यात येणा-या रस्त्यांसाठी अरुर चाचणी मेरी संस्थेमार्फतच करुन घेणे "अनिवार्य" करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. तसेच सर्व मुख्य अभियंत्याना कळविण्यात येते की, सवलत करारनाम्यातील अटी व शर्ती मध्ये अरुर चाचणी, मेरी संस्थेमार्फतच घेणे बाबतची अट समाविष्ठ करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( अतुल भि. चव्हाण )
अवर सचिव( खा. र. २ ), महाराष्ट्र शासन

प्रति,

महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, दिंडोरी रोड, नशिक,
मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
मुंबई/पुणे/नाशिक/नागपूर/औरंगाबाद/अमरावती/ यांत्रिक/राष्ट्रीय महामार्ग, मुंबई/ विशेष प्रकल्प, मुंबई.

"महाराष्ट्र शासन"
अधीक्षक अभियंता
सा. बां. मंडळ, नाशिक
यांचे कार्यालय
आवक क्र 9220
दिनांक 28/6/15

मुख्य अभियंता

अधीक्षक अभियंता

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग

कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग मालेगाव

P.T.O